डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील असुधारीत (सहाव्या वेतन आयोगानुसार) वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांना दिनांक 1 जुलै, 2019 पासुन महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

वाचा: 1)शासन वित्त विभाग निर्णय क्र.मभवा.1319/प्र.क्र.30/सेवा-9, दिनांक: 4 जानेवार,2020.
2)शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा.2020/प्र.क्र.1/सेवा-4, दिनांक: 7 जानेवार,2020.

## आदेश

क्र.अप्रवि/मभवा/निमवा/2019-20/**3040.** **दिनांक** :15/01/2020.

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक 4 जानेवारी, 2020 व दिनांक 7 जानेवारी, 2020 अन्वये असुधारीत वेतन संरचनेत(सहाव्या वेतन आयोगानुसार) वेतन घेणा-या अधिकारी/कर्मचारी व पुर्णकालीन अधिकारी/कर्मचारी व तसेच असुधारित वेतनश्रेणीत (सहाव्या वेतन आयोगानुसार) निवृत्तीवेतन धारक/ कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना दिनांक 1 जुलै, 2019 पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन** यांच्या एकूण रकमेवर दिनांक 1 जुलै, 2019 पासून 10 % दराने अनुज्ञेय महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या 154 % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे एकूण वेतनाच्या 164 % महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना/ निवृत्तीवतनधारक/ कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना दिनांक 1 डिसेंबर, 2019 पासुन उपरोक्त महागाई भत्याची वाढ रोखीने देण्यात यावी.

सदरहू महागाई भत्याची वाढ दिनांक **1 डिसेंबर, 2019 चे वेतन देयकापासून लागु करावी. तसेच माहे 1 जुलै, 2019 ते 30 नोंव्हेबर, 2019 या 5 महिन्याच्या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकीबाबत स्वत्रंतपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.** 1 **डिसेंबर**, 2019 च्या महागाई भत्ता थकबाकी देयके माहे **जानेवारी-2020 देय फेब्रुवारी** -2020 चे नियमित मासिक वेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन **2019-20** चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत **2019-20** करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने...

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रति:1) नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).

________________________________________

2) प्राचार्य ________________________________

3) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित. निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना **1 डिसेंबर,2019** पासुन निवृत्ती वेतनावर सध्याचा महागाई भत्ता दर 154% ऐवजी 164% लागु करण्यात येत आहे. माहे **जानेवारी-2020 देय फेब्रुवारी -2020** चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करण्यात यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारित करु नये.

नियंत्रक